# ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**( फक्त सभासदांसाठी )**

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, कर्मवीर भाऊराव पाटील मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि; जयसिंगपूर या संस्थेची सन **२०२४-२५ या सालाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ३०/०८/२०२५ रोजी दुपारी २-०० वाजता, स्व. शामराव पाटील यड्रावकर नाट्यगृह, ६ वी गल्ली, जयसिंगपूर** ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथे बोलाविण्यात आली आहे. कृपया सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

## ✻ सभेपुढील विषय ✻

१. दि.०१/०९/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.
२. सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक स्विकारणे.
३. सन २०२४-२५ सालची नफा विभागणी करणे.
४. सन २०२४-२५ मध्ये झालेल्या खर्चास, अंदाजापेक्षा जादा झालेल्या खर्चास व सन २०२५-२६ सालच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
५. सन २०२३-२४ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
६. सन २०२४-२५ सालच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
७. सन २०२५-२६ सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करुन त्यांचा मेहनताना ठरविणेबाबत विचार करणे.
८. कर्ज परतफेड योजने अंतर्गत व एक रक्कमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत कर्जदारांना दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.
९. सन २०२४-२५ मध्ये राखीव निधी, सभासद कल्याण निधी, सेवक कल्याण निधी, धर्मादाय निधी, कर्मवीर रिलीफ फंड व प्रशिक्षण निधीमधून केलेल्या खर्चास मंजूरी देणे.
१०. विशिष्ट राखीव निधी आणि इतर निधींची निर्मिती करणे.
११. संस्थेचे संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
१२. दीर्घकालीन व्यावसायिक दृष्टीकोन व वार्षिक परिचलन योजनांना मान्यता देणे.
१३. संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नातेवाईक असलेल्या कर्मचाऱ्यांची नोंद घेणे.
१४. संस्थेच्या नवीन शाखा सुरु करणेबाबत विचार करणे.
१५. आयत्यावेळच्या विषयावर मा. अध्यक्षांचे परवानगीने विचार करणे.

**येणेप्रमाणे कळावे.**

| | | |
|---|---|---|
| **स्थळ : जयसिंगपूर** | **चंद्रकांत धुळासावंत** | **अरविंद मजलेकर** |
| **दिनांक : १४/०८/२०२५** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **चेअरमन** |

**सूचना :-**

१) ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजाबाबत माहिती विचारावयाचे किंवा सूचना करावयाच्या असतील त्यांनी दि.२५/०८/२०२५ पर्यंत प्रशासकीय कार्यालयात लेखी आणून द्याव्यात.
२) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेतली जाईल. त्यास कोरमचे बंधन असणार नाही.
३) सन २०२४-२५ चा सविस्तर वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक, अंदाजपत्रक संस्थेचे मुख्यालय, सर्व शाखांमध्ये व संस्थेच्या वेबसाईट www.karmaveermultistate.com या लिंकवर पहावयास मिळेल.